Reg. No. NP CITY/236/2015-17

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ३, अंक ४४]  गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १६-२२, २०१७/कार्तिक २५-अग्रहायण १, शके १९३९ [पृष्ठे १९, किंमत : रुपये ११.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १८८.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २ नोव्हेंबर, २०१७.

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२४१६-प्र.क्र. १९९-२०१६-नवि-९.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ)-९७-नवि-९, दिनांक ७ जानेवारी, २००० अन्वये भागशः मंजूर व क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र. क्र. २००-२०००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर, २००१ नुसार अंतिमतः मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दिनांक १ मार्च, २००० व दिनाक २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे) तसेच शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४०१-८५५-प्र. क्र. ७६-नवि-९, दिनांक २७ फेब्रुवारी २००२ अन्वये सात योजना करीता नागपूर सुधार प्रन्यासला " नियोजन प्राधिकरण " म्हणून घोषित केलेले आहे, (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे दाभा खसरा क्र. १७/२ क्षेत्र २.४७ हेक्टर आर जमीन कृषी विभागात समाविष्ट आहेत (यापुढे " उक्त क्षेत्र " असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी नियोजन प्राधिकरण म्हणून (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे संबोधले आहे) त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ११/११२६, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१३ नुसार उक्त क्षेत्राचा वापर कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे ठरवून, त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे " उक्त फेरबदल" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त क्षेत्र कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा उक्त फेरबदल प्रस्ताव, काही अटींच्या अधिन राहून मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १९०.

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

(महाराष्ट्र अधिनियम क्रमांक XXXVII, १९६६)

क्रमांक मविविकं-मिहा-१२२-०८७८-२०१७.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (यापुढे जिचा उल्लेख "एमएडीसी" करण्यात आला आहे.) जी, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये संस्थापित आहे आणि महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक XXXVII, १९६६) च्या कलम ४० च्या, उप-कलम (१ बी) अन्वये, प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून एमएडीसीला, नागपूर येथील मल्टी-मोडल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट (मिहान) च्या अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर्हू अधिनियमाच्या कलम ४० च्या उप-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या प्रकरण ६ च्या तरतुदी, मिहान अधिसूचित क्षेत्राला नवीन नगर समजून, विकास प्राधिकरणाप्रमाणेच विशेष नियोजन प्राधिकरणाला लागू आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर्हू अधिनियमाच्या कलम १५१ आणि कलम १५२ च्या पहिल्या परंतुकाच्या अन्वये नवीन नगर विकास प्राधिकरणाच्या अधिका-यांना प्रदान केलेल्या प्राधिकरणाच्या अधिकाराचा वापर व कार्य पार पाडत असलेल्या जबाबदा-या यांची जनतेला माहितीसाठी राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, एमएडीसीचे संचालक मंडळाच्या २२ जानेवारी, २०१० रोजी झालेल्या २८ व्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर अधिनियमाच्या कलमे ४४, ४५, ४८, ५१ ते ५६, ५८, १३५, १३६ व १३९ खालील अधिकार विविध अधिका-यांकडे सुपूर्द केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, एमएडीसीचे विविध अधिका-यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा, विविध विभागांचे पार पाडीत असलेल्या कामाचे स्वरूप व जबाबदा-या लक्षात घेता कामकाजाच्या सोयीसाठी अधिकार प्रदान करण्याच्या आधीच्या ठरावात सुधारणा करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५२ व इतर सक्षम अधिकाराद्वारे एमएडीसीला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून संचालक मंडळाने दिनांक १४ जून, २०१७ रोजी झालेल्या ५९ व्या बैठकीत यासंदर्भाने आधी ठराव अधिक्रमित करून खालील नवीन ठरावाप्रमाणे प्राधिकरणाच्या विविध अधिका-यांना सदर अधिनियमाच्या उद्दिष्टासाठी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांना, अधिकार प्रदान करणारा ठराव संमत करण्यात आला आहे ;

असा ठराव करण्यात येतो की, सदर संचालक मंडळ आधी संमत केलेले ठराव अधिक्रमित करून जोडपत्र-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकार प्रदान करण्यासाठी मान्यता देत असून तसेच अधिनियमांतर्गत विविध अधिकार वापर करण्यासंबंधीचे प्रशासकीय आदेश व नगर रचना अधिकारी व अतिरिक्त नगर रचना अधिकारी यांना प्रधिकृत करण्याचा अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात येत आहे.

**जोडपत्र—१**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५२ नुसार व त्याअनुषंगाने सक्षम असलेल्या अधिकारांचा वापर करून एमएडीसी याद्वारे त्यांच्या खाली नमूद केलेल्या अधिका-यांना अधिनियमाच्या विविध कलमांनुसार विविध कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

***प्राधिकरणाच्या विविध अधिका-यांना प्रदान करणारे अधिकारासंबंधी खालील नवीन ठराव संमत केला आहे.

| अ.क्र. | प्राधिकर्ता अधिकारी | अधिकारांचा वापर करण्याचा आणि काम करण्याचा अधिकार दिलेले एमएडीसीचे अधिकारी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| **नियोजन विभाग :** | | |
| १ | प्राधिकृत नगर रचना अधिकारी (टीपीओ) | कलमे २५, ४३, ४५, ४६, ४८, ५१, ५२ ते ५७, १२४ के, १३५ |
| २ | अतिरिक्त नगर रचना अधिकारी (एटीपीओ) | कार्यारंभ दाखला (सीसी) दिल्यानंतर, भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित होईपर्यंत. |

**जोडपत्र—१**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **अनधिकृत बांधकाम नियंत्रक :** | | |
| ३ | अनधिकृत बांधकाम नियंत्रक (सीयुसी) | एमएडीसीच्या कार्यक्षेत्रातील सर्व अथवा कोणत्याही अनधिकृत व बेकायदा विकासाबाबत कलमे ५२ ते ५७, १२४ के, १३५ अंतर्गत सर्व अधिकार. |
| ४ | अधीक्षक अभियंता | |
| ५ | कार्यकारी अभियंता | |
| ६ | अतिरिक्त जिल्हाधिकारी | |
| ७ | उप जिल्हाधिकारी | |
| **मालमत्ता विभाग :** | | |
| ८ | विपणन खातेप्रमुख/महाव्यवस्थापक (विपणन) | कलमे ५२ ते ५७, १२४ के, १३५ सर्व अधिकार. |
| ९ | वरिष्ठ विपणन व्यवस्थापक | १. करारपट्टा (Agreement to Lease) केल्यानंतर व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ४५ नुसार कार्यारंभ प्रमाणपत्र (सीसी) निर्गमित करण्यापूर्वीपर्यंत सर्व भूखंड. २. भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) निर्गमित केल्यानंतर. ३. एमएडीसीची सर्व बांधकाम जमिनीसह. |
| १० | विपणन व्यवस्थापक | |
| ११ | मालमत्ता अधिकारी | |
| **आदेश व कागदपत्रे प्रमाणीकरण :** | | |
| १२ | मुख्य अभियंता, महाव्यवस्थापक (तांत्रिक), मुख्य नियोजनकार, अतिरिक्त मुख्य नियोजनकार, अधीक्षक अभियंता, ज्येष्ठ वास्तुरचनाकार, ज्येष्ठ विपणन व्यवस्थापक, विपणन व्यवस्थापक, मालमत्ता अधिकारी, कार्यकारी अभियंता, अन्य खाते प्रमुख/विभाग प्रमुख, की ज्यांच्याकडे हे आदेश जारी करण्याचा/कागदपत्रे तयार करण्याचा वा ताब्यात ठेवण्याचा अधिकार आहे. | कलम १३९ अंतर्गत आदेश व कागदपत्रे प्रमाणित करण्याचे सर्व अधिकार. |
| १३ | सह व्यवस्थापकीय संचालक/व्यवस्थापकीय संचालक | कलम १४२ आणि १४३ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यास मान्यता व अपराध सामोपचाराने निकालात काढणे. |

प्रदान केलेला उपरोक्त अधिकार सर्वसाधारण स्वरूपाचे असून ते पुढील बाबींच्या अधीन राहील :—

१. उपरोक्त सर्व प्रकरणांमध्ये उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी प्राधिकृत केलेले प्रत्येक खात्यातील अधिकारी हे प्रदत्त अधिकारानुसार पावले उचलण्यास जबाबदार राहतील. त्याबाबत उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांकडून यासंदर्भाने अधिकारांच्या मर्यादा ठरवून देण्याबाबतचे कार्यालयीन आदेश स्वतंत्रपणे जारी करण्यात येतील.

२. एमएडीसीच्या विविध खात्यांना नेमून दिलेली विवक्षित कामे व जबाबदा-यांचे स्वरूप लक्षात घेता उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हे उपरोक्त कलमांन्वये दिलेले विविध अधिकार वापरण्यासाठी उपरोक्त परिशिष्टातील विशिष्ट कलमांनुसार कोणत्याही अधिका-याला सक्षम प्राधिकर्ता म्हणून जबाबदारी देऊ शकतील.

३. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांचे कार्यालयीन आदेश एमएडीसीच्या वेबसाईटवर उपलब्ध राहतील. https://made.maharashtra.gov.in

४. हे अधिकार प्रदान, यापूर्वीच्या सर्व ठरावानुसार प्रदान केलेले अधिकार संपुष्टात आणून अंमलात येईल.

संचालक मंडळ असाही ठराव मंजूर करीत आहे की, अधिकार प्रदान करण्यासंबंधीची माहिती, जनतेच्या माहितीसाठी शासकीय राजपत्रात आणि नागपूर शहर परिसरात मोठा खप असलेल्या इंग्रजी आणि मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

ठरावात पुढे असेही नमूद करण्यात येत आहे की, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना ठरावाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक कोणतीही कृती, कृत्य, प्रकरण आणि बाबी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

संचालक मंडळ, एमएडीसीच्या आदेशानुसार,

मुंबई :
दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७.

(अवाच्य),
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र विमानतळ विकासे कंपनी मर्या.

ना-एक-अ-२ (१५०२).

भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १९१.

BY VICE CHAIRMAN AND MANAGING DIRECTOR

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

**(Maharashtra Act, No. XXXVII of 1966)**

No. MADC-MIHA-122-0878-2017.—

WHEREAS, Maharashtra Airport Development Company Limited, hereinafter referred to by its acronym "MADC" is a company incorporated under the Companies Act, 1956 and functions under the superintendence and control of the Government of Maharashtra ;

AND WHEREAS, the Government of Maharashtra, has in exercise of its power under sub-section (*1B*) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) appointed MADC to be the Special Planning Authority for the notified area of Multi-modal International Hub Airport at Nagpur (MIHAN) ;

AND WHEREAS, it is provided in sub-section (*3*) of Section 40 of the said Act that, the provisions of Chapter VI of the said Act apply *mutatis mutandis* to the Special Planning Authority as they apply in relation to a Development Authority as if the notified area were a new town ;

AND WHEREAS, the New Town Development Authority is, under Section 151 of the said Act read with the first proviso to Section 152 of the said Act required to publish in the Official Gazette, the Officers of the Authority who will exercise powers and perform the functions of the Authority for the information of the public ;

AND WHEREAS, MADC has delegated its powers under Sections 44, 45, 48, 51 to 56, 58, 135, 136 & 139 of the said Act to various officers in pursuance of decision of Board of Directors of MADC in its 28th meeting held on 22-1-2010 ;

AND WHEREAS, it is felt expedient to modify the earlier Resolution of Delegation of powers and functions to various officers of MADC with due regard to the nature and functions performed by various departments ;

AND WHEREAS, in exercise of the powers conferred upon MADC under provisions of Section 152 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) and all other powers enabling it in this behalf, the Board in its 59th meeting held on 14th June, 2017 has passed the following Resolution in supersession of all the earlier Resolution passed by the Board in this behalf, delegating its powers and functions for the purpose of the said Act to its officers designated therein.

" RESOLVED THAT the Board in supersession of earlier resolution, do hereby approve the Power of Delegation as per Annexure-1 and hereby, authorize VC & MD to issue administrative instructions regarding exercise of powers under the Act including designating Town Planning Officer and Additional Town Planning Officer to deal with the development proposal and other functions as per the Act."

ANNEXURE-1

In exercise of powers conferred under Section 152 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Act ") and all powers enabling in this behalf MADC hereby designates its officers to exercise its powers and perform the functions under various sections of the said Act as udner :—

| Sr. No. | Designated Officer | Nature of Powers to be exercised and performed |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| **Planning Department :** | | |
| 1 | Designated Town Planning Officer (TPO) | Powers under Sections 25, 43, 44, 45, 46, 48, 51, 52 to 57, 124K, 135 after granting Commencement Certificate (CC), till grant of Occupancy Certificate (OC). |
| 2 | Additional Town Planning Officer (ATPO) | |

ANNEXURE-1–*Contd.*

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| **Controller of Unauthorized Constructions :** | | |
| 3 | Controller of Unauthorised Constructions (CUC) | All powers under Sections 52 to 57, 124K, 135 in respect of all or any unautorized/illegal development within the jurisdiction of MADC. |
| 4 | Suptd. Engineer | |
| 5 | Executive Engineer | |
| 6 | Additional Collector | |
| 7 | Deputy Collector | |
| **Estate Department :** | | |
| 8 | Head of Mkt. Sections/GM (Mkt.) | All powers under Sections 52 to 57, 124K, 135 :<br>1. In respect of plots, after execution of agreement to lease and before grant of Commencement Certificate (CC) under Section 45 of the MRTP Act.<br>2. In respect of all properties, after grant of Occupancy Certificate (OC).<br>3. All MADC constructed premises, including land attached thereto. |
| 9 | Sr. Marketing Manager | |
| 10 | Marketing Manager | |
| 11 | Estate Officer | |
| **Authentication of orders and documents :** | | |
| 12 | CE, GM (Tech.), Chief Planner, Addl. Chief Planner, Supdt. Engineer, Sr. Architect, Sr. MM, MM, Estate Officer, CUC, Executive Engineer, Other Heads of Departments/ Sections who are the initiators/Custodians of such orders/documents. | All powers under Section 139 for authentications of orders/documents. |
| 13 | JMD/MD | All powers under Sections 142 and 143 for sanction of prosecution and compounding of offences. |

The above delegation of powers is general in nature and subject to the following :–

1. In all the above cases, the officers so designated by VC & MD, in each department shall be responsible for taking steps as per delegation of power. A separate Office Order shall be issued by VC & MD indicating extent of delegation of power in this effect.

2. Having regard to the nature of duties & functions to be performed by the various Departments of MADC, VC & MD may assign the powers under the above sections to any of the designated officers mentioned against the specific sections in the above Schedule.

3. The Office Order issued by VC & MD as above shall be uploaded on MADC website https://made.maharashtra.gov.in.

4. The present delegation of powers shall come into force in supersession of all the delegation of powers issued in the past in this behalf.

" RESOLVED FURTHER THAT the Board do hereby authorize VC & MD to publish delegation of powers for information of public in Govt. Gazette as well as English & Marathi Newspapers having its wide circulation around Nagpur city."

" RESOLVED FURTHER THAT the Vice Chairman and Managing Director be and is hereby authorized to do all such acts, deeds, matters and things as may be deemed necessary or expedient to give effect to the Resolution."

By Order of the Board of Directors, MADC,

Mumbai
Dated the 16th October 2017.

(Illegible),
Vice Chairman & Managing Director,
Maharashtra Airport Development Company Ltd.